**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी अवलंबित विश्वस्त संस्था**

४ था मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

जा.क्र. : काऔसंविभाग/ मानिभ/ 23338 दिनांक : २६/०७/२०११

## परिपत्रक

विषय : मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना मागील मुदतीचे द्यावयाचे मासिक निर्वाह भत्त्याचे धनादेशाबाबत.

संदर्भ : विश्वस्त संस्थेचे परिपत्रक क्र. काऔसंवि/मानिभ/१६८५३ दि. ०४/०४/२००७.

*************

वरील विषयासंबंधी विश्वस्त संस्थेने काढलेल्या परिपत्रकामध्ये योग्य त्या सूचना देऊन देखील सर्वच्या सर्व परिमंडळामधून मागील मुदतीचे अथवा त्याची मुदत बदलून देण्यासाठी विश्वस्त संस्थेकडे तातडीने मागणी न करता १ ते ३ वर्षांनी विनंती अजूनही करीत असतात. या परिपत्रकाद्वारे पुन्हा एकदा असे सूचित करण्यात येते की, कोणत्याही अवलंबिताचे प्रशासकीय कारणास्तव धनादेश वितरित झाले नसल्यास अथवा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये काही कारणास्तव बँकेत जमा केली गेली नसल्यास विश्वस्त संस्थेच्या कार्यालयाकडे दिरंगाई न करता ताबडतोब पत्रव्यवहार करावा अन्यथा परिमंडळाने केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

यासंबंधी विश्वस्त संस्था पुन्हा एकदा खालीलप्रमाणे सूचना देत आहेत.

१) प्रत्येक महिन्यामध्ये देण्यात येणाऱ्या धनादेशाचे वितरण ताबडतोब संबंधित अवलंबितांना करण्यात यावे.

२) तो धनादेश बँकेमध्ये ताबडतोब व वेळेवर भरण्याची जबाबदारी संबंधित अवलंबितांची आहे.

३) अवलंबितान त्यांना देण्यात आलेला धनादेश मुदतीमध्ये बँकेमध्ये भरला नसल्यास ती त्या अवलंबिताची जबाबदारी असल्यामुळे त्यांना नवीन धनादेश देण्याबाबत शिफारस करण्यात येऊ नये. काही विशेष कारणास्तव धनादेश भरला गेला नसेल अथवा काही प्रशासकीय कारणानुसार तसे झाले तरच नवीन धनादेश देण्याबाबत विचार केला जाइल. परंतु या बाबत परिमंडळाकडून वेळेवर पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे.

४) तसेच जर अवलंबिताकडून त्यांना देण्यात आलेला धनादेश त्यांच्याकडून खराब, फाटला अथवा गहाळ झाल्यास त्यांना नवीन धनादेश देण्याबाबत आग्रह धरु नये.

५) काही वारस परस्पर बँकेला व विश्वस्त संस्थेस नवीन धनादेश देण्याबाबत पत्रव्यवहार करीत असतात हे योग्य नाही. तरी परिमंडळांनी परिपत्रक काढून त्यांनी बँकेस अथवा विश्वस्त संस्थेकडे परस्पर पत्रव्यवहार करु नये अशा सूचना त्यांना देण्यात याव्यात.

E:\Backup Of Meena\D Drive\SP\Mane\magil mudatiche ... .doc

3589 - Borse

meshari

तसेच या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येते की, दि. ३१/१२/२०१० पूर्वीचे धनादेश बदलून देण्यासाठी किंवा मागील मुदतीचे नवीन धनादेश देण्याबाबत आग्रह करु नये व अशा पत्रव्यवहारांचा योग्य कारण असल्याशिवाय विचार केला जाणार नाही. तसेच यापुढेही धनादेशाच्या तारखेपासून जर सहा महिन्याच्या आत विश्वस्त संस्थेच्या कार्यालयास कळविले नसल्यास अशा पत्रव्यवहारावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

दि. ०४/०४/२००७ रोजी काढण्यात आलेल्या परिपत्रकांची छायांकित प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे.

किशोर पवार
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
व सदस्य सचिव

दिनांक 28 JUL 2011
सही

प्रत,
प्रेषण यादीप्रमाणे (तिन्ही कंपन्यांमधील) मुख्य अभियंता / मुख्य महाव्यवस्थापक (नि.) / महाव्यवस्थापक, सांघिक कार्यालय, मुंबई.